# शासकिय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## १५ ऑगस्ट स्वतंत्रदिन.

## अहवाल.

### ध्वजारोहण.

दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये ७८व्या भारतीय स्वतंत्रदिनाच्या निमित्ताने सकाळी ठीक ७:३० वाजता महाविद्यालयाच्या प्राचार्य मा.डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला सलामी दिल्यानंतर सर्वांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीताचे गायन केले.

### देशभक्तीपर समूहगीत गायन.

महाविद्यालयातील सरस्वती कक्षामध्ये मराठी व हिंदी देशभक्तीपर समूह गीतगायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.. या कार्यक्रमात महाविद्यालयातील बी.एड .प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थ्यांच्या अरवली व विंध्याचल या दोन्ही कुलातील प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्येकी एक मराठी व एक हिंदी देशभक्तीपर गीताचे समूहगायन केले.

### प्रभातफेरी.

शासनाकडून प्राप्त झालेल्या परिपत्रकानुसार 'हर घर तिरंगा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या आसपास असणाऱ्या पुतळ्यांची स्वच्छता करण्याचा कार्यक्रम राबवण्याच्या सूचनेनुसार महाविद्यालयाच्या परिसरापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पनवेल पर्यंत प्रभातफेरी चे आयोजन करण्यात आले. त्यानंतर पुतळ्याची व परिसराची स्वच्छता करण्यात आली. प्रभातफेरीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक व सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. महाविद्यालयात परत येऊन १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमांची सांगता झाली. छात्रपरिषदेचे समन्वयक प्रा.डॉ. बी.जी.खाडे यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व कार्यक्रम पार पडले.

# १५ ऑगस्ट २०२४ स्वातंत्र्यदिन क्षणचित्रे.





















